राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित
प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा,
उच्च माध्यमिकचे वर्ग/कनिष्ठ
महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर
कर्मचा-यांना सुधारित सेवानिवृत्ती वेतन,
कुटुंब निवृत्ती वेतन यामध्ये सुधारणा

महाराष्ट्र शासन,
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक-सेनिवे २०१०/(१६६/१०)/माशि २
मंत्रालय विस्तार भवन, मुंबइ ४०० ०३२.
दिनांक : ९ एप्रिल, २०१०

वाचा :- १) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक सेनिवे १००८/प्र.क्र.९९/सेवा-४, दिनांक २७ ऑक्टोबर,२००८
२) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक वेपुर १२०९/प्र.क्र.२०/सेवा-९, दिनांक २७ फेब्रुवारी,२००८
३) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक सेनिवे १००९/प्र.क्र.२९/सेवा-४, दिनांक ५ मे,२००९
४) शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग क्रमांक सेनिवे १००९/प्र.क्र.२९/सेवा-४, दिनांक २२ जून,२००९
५) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक सेनिवे १००९/प्र.क्र.३३/सेवा-४, दिनांक २२ जून,२००९
६) शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग क्रमांक सेनिवे १००९/प्र.क्र.२९/सेवा-४, दिनांक ७ जुलै,२००९
७) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक सेनिवे १००९/प्र.क्र.३३/सेवा-४, दिनांक ३० ऑक्टोबर,२००९
८) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.सवेआ/१००८/(५२१/०८)/ माशि-२, दिनांक १२ जून,२००९

**<u>शासन निर्णय</u>** : राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक,माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिकचे वर्ग/कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना दि.१२ जून,२००९ च्या शासन निर्णयाव्दारे सहावा वेतन आयोग लागू करण्यात आलेला आहे.

२. वित्त विभागाच्या दि.५ मे,२००९ च्या शासन निर्णयाव्दारे दि.१ जानेवारी,२००६ पूर्वी निवृत्ती वेतनधारकांना सुधारित निवृत्ती वेतन देण्याबाबत निर्णय झालेला आहे. तसेच वित्त विभागाच्या दिनांक ३० ऑक्टोबर,२००९ च्या शासन निर्णयामध्ये दि.१ जानेवारी,२००६ नंतरच्या निवृत्ती वेतनात व कुटुंब निवृत्ती वेतनात सुधारणा करण्याचा निर्णय झालेला आहे. त्या अनुषंगाने राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक,माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिकचे वर्ग/कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना या दोन्ही वित्त

विभागाच्या शासन निर्णयाव्दारे निवृत्ती वेतनात करण्यात आलेल्या सुधारणा जशाच्या तशा लागू करण्यात येत आहेत.

३. या आदेशान्वये लागू करण्यात आलेल्या सुधारित निवृत्ती वेतन/कुटुंब निवृत्ती वेतन संरचनेमुळे होणारा अतिरिक्त खर्च निवृत्ती वेतनधारकांचे निवृत्ती वेतन ज्या अर्थसंकल्पीय शिर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात त्या शिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या त्या शिर्षांतर्गत मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. तथापि आवश्यक भासल्यास संचालक, प्राथमिक व माध्यमिक व उच्च माध्यमिक यांनी खर्च भागविण्यासाठी विधीमंडळाच्या येत्या अधिवेशनात पूरक मागणी सादर करण्याची आवश्यक ती कार्यवाही करावी.

४. याबाबतची योग्य ती कार्यवाही संचालक, प्राथमिक व संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक यांनी तात्काळ करण्याची दक्षता घ्यावी.

हा शासन निर्णय शासनाचे संकेत स्थळ www.Maharashtra.gov.in यावर उपलब्ध होईल. याचा संगणक सांकेतांक क्रमांक-- २०१००४१२१८४५८५४००१ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

**( अ. मा. भट्टलवार )**
**शासनाचे सह सचिव**

**प्रति,**

महालेखापाल,( लेखा परीक्षा ) महाराष्ट्र १/२, मुंबई,नागपूर
महालेखापाल ( लेखा अनुज्ञेयता ) महाराष्ट्र१/२, मुंबई, नागपूर
शिक्षण संचालक(माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य,पुणे ( ५ प्रती )
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे ( ५ प्रती )
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
शिक्षणाधिकारी ( माध्यमिक/प्राथमिक ), जिल्हा परिषद,
सर्व शिक्षण निरिक्षक, बृहन्मुंबई
सर्व जिल्हा कोषाधिकारी,
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
मुख्य लेखा परीक्षक, सानिक निधी लेखा, नवी मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद
सर्व वरिष्ठ लेखा परीक्षक ( शिक्षण विभाग ),
वित्त विभाग (सेवा- ४), मंत्रालय, मुंबई,
मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव
कार्यासन प्राशि १/प्राशि ३/अर्थसंकल्प कक्ष/उमाशि-१, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
निवड नस्ती- माशि २